# किशोरावस्थेत माहिती व तंत्रज्ञानाचा होणारा परिणाम एक मानसशास्त्रीय अभ्यास

प्रा. पी.बी. इंगळे
राज्यशास्त्र विभाग, इंदिरा महाविद्यालय, कळंब, जिल्हा यवतमाळ
भ्रमणध्वनी ९१५८६८६०६६ E mail: panduranggingle@gmail.com

## सारांश

माहिती व तंत्रज्ञान हा आजच्या युगातील एक महत्त्वाचा आणि जीवनोपयोगी विषय आहे; शिक्षण क्षेत्र, वैद्यकीय क्षेत्र, व्यावसायिक क्षेत्र, अशा अनेक मानवी जीवनातील कार्यक्षेत्रांमध्ये हा विषय अपरिहार्य बनला आहे. शिक्षण क्षेत्रात तीनही प्रकारच्या विद्याशाखेत माहिती व तंत्रज्ञानाने प्रगती केली आहे. आज शिक्षणक्षेत्रात माहिती तंत्रज्ञानाने मोठी क्रांती घडून आणली आहे. 'व्हर्चुअल क्लास रूम' ही संकल्पना याच तंत्रज्ञानाचा एक पैलू आहे. डिजिटलायझेशनच्या माध्यमातून शालेय जीवनाचे स्वरूप हे पूर्णत: बदलेले आहे. पूर्वी शालेय जीवनात विद्यार्थी वह्या, पुस्तके, पाटी, पेन्सिल, खडू, लेखणी, इत्यादी शालेय साहित्याचा वापर करत असत. परंतु डिजिटलायझेशनमुळे या साहित्याची जागा एलसीडी प्रोजेक्टर, टॅब, कॉम्प्युटर, मोबाईल यांनी घेतली आहे. यामुळे विषयाचे स्वरूप कितीही अवघड असले तरी आकृती, चित्रांचा हुबेहूब वापर करण्यास, हे तंत्रज्ञान विषय समजावून देण्यासाठी शिक्षकासाठी व विद्यार्थ्यांसाठी विषयाचे आकलन करण्यास खूपच उपयोगी पडतो.

प्रस्तुत संशोधनाचा मुख्य उद्देश हा किशोरावस्थेत माहिती व तंत्रज्ञानाचा भावनिक बुद्धिमत्तेवर होणारा परिणाम याचा अभ्यास करण्याचा आहे. यासाठी संशोधकाने शालेय विद्यार्थ्यांचे दोन गट निवडले. त्यात व्हर्च्युअल क्लास मधील २० मुले पारंपारिक वर्गातील २० मुले असा तयार केला. दोन्ही गटाला डॉ. एन. के. चंदा यांची सामाजिक बुद्धिमत्ता चाचणी दिली. मिळालेल्या प्रदत्त घेऊन संख्या विश्लेषणातून सार्थक परिणाम दिसून आले. ज्या मुलांची भावनिक बुद्धिमत्ता अधिक होती, ती कम्प्युटरचा अधिक वापर करणारी दिसून आली.

## प्रस्तावना

वैकासिक मानसशास्त्रात किशोरांच्या बद्दल, त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासावर, वाढ आणि विकासावर भरपूर संशोधन झाले आहे. किशोरावस्था याला इंग्रजीत 'ॲडोलेसेन्स' असे म्हणतात. हा शब्द लॅटिन क्रियापदापासून तयार झाला आहे. परिपक्वता लाभणे असा याचा अर्थ आहे. प्रस्तुत संशोधन हे किशोरांच्या भावनिक विकासावर माहिती व तंत्रज्ञाना काय परिणाम होतो या संदर्भात केले आहे. आधुनिक युगात संगणकाचा वापर हा विविध क्षेत्रात वाढत आहे. या संगणाचे मानवी जीवनात अनेक चांगले परिणाम झाले. त्या संदर्भात अनेक संशोधने झाली आहेत. तसेच संगणकाच्या वापरामुळे मानवी आरोग्यावर विपरित परिणाम होतात. या बाबतही अनेक निष्कर्ष मांडले आहेत.

## भावना विकास

व्यक्तीच्या मनाच्या आंतरिक अवस्थेला भावना, इमोशन असे म्हणतात. व्यक्तीचा जीवन अनुभव जसा जसा वाढत जातो तसतसे व्यक्तीच्या अंतरंगातील अवस्थेचा म्हणजे भावनेचा विकास होतो. बाल्यावस्थेत होणारी जडणघडण हा मुख्य पाया समजला जातो. बाल्यावस्थेत भावनेचे स्वरूप हे खूपच मर्यादित असते जसे की लहान मूल प्राथमिक गरजा पूर्ण झाल्या तर आंनदी, समाधानी असते. जर प्राथमिक गरजा पूर्ण झाल्या नाही तर दु:खी होते, कधी भुकेसाठी तर कधी झोपेसाठी रडते. वाढत्या वयानुसार भावनेचा विकास होत जातो. मग शारीरिक गरजांपलीकडे जाऊन मनाविरुद्ध झाले म्हणून राग येणे, जे वाटते ते इतरांना नीट न समजल्यामुळे मनाची होणारी चिडचीड, नंतर निराशा, खिन्नपणा अशा दु:खाच्या वेगवेगळ्या छटा तयार होतात. पुढे जाऊन मान, अपमान, राग, संताप असे भावनेतील फरक जाणवायला लागतात. प्रेमाचे माणूस कोणते आणि अनोळखी कोण हा फरक कळायला लागतो. एरिक एरिकसन यांनी असे म्हटले की, तान्हेपणी विश्वाचे नाते निर्माण होणे किंवा न होणे यावर पुढील आयुष्यात होणारी व्यक्तिमत्त्वाची जडणघडण अवलंबून असते.

भावना देहबोलीतून व्यक्त होतात. लहानपणापासून इतरांच्या भावना ओळखून स्वत:ला जे वाटते ते प्रकट करणे याला सुरुवात होत असते. स्वत:च्या भावना जाणणे, इतरांच्या भावना ओळखणे हे औपचारिक अभ्यासापेक्षा वेगळे आहे. बुद्धीचाच एक पैलू ‘भावनिक बुद्धिमत्ता’ आहे. भावनिक बुद्धिमत्तेशी निगडित आणखी एक पैलू म्हणजे सामाजिक बुद्धिमत्ता होय.

**समस्या :** किशोरावस्थेतील मुलामुलींच्या भावनिक बुद्धिमत्तेवर होणारा माहिती व तंत्रज्ञानाचा परिणामाचा अभ्यास.

**उद्देश :** किशोरावस्थेतील मुलामुलींच्या भावनिक विकासावर माहिती व तंत्रज्ञानाचा होणारा परिणाम अभ्यासणे.

**गृहितके :**
१. किशोरावस्थेतील मुलामुलींमधील भावनिक बुद्धिमत्तेत माहिती व तंत्रज्ञानाचा सार्थक परिणाम दिसून येईल.
२. माहिती तंत्रज्ञानाचा अधिक वापर करणाऱ्या मुलींचा भावनिक विकास हा इतर मुलांच्या तुलनेत अधिक असेल.

**संशोधन साहित्य :** डॉ. एन.के. चंदा यांची समाजिक बुद्धिमत्ता चाचणी.

## संशोधन आराखडा :

प्रस्तुत परिणामाचा अभ्यास करण्यासाठी खालील संशोधन आराखडा उपयोगात आणला.

२ × २ घटकात्मक संशोधन आराखडा

| लिंग | गट | |
|---|---|---|
| | व्हर्च्युअल क्लास | परंपारिक क्लास |
| मुले | २० | २० |
| मुली | २० | २० |
| एकूण | ४० | ४० |

एकूण ८० प्रयुक्तांची अनियत पद्धतीने प्रयुक्तांची निवड केली.

## परिवर्त्य :

स्वतंत्र परिवर्त्य : अ. निवासाचे क्षेत्र
१. व्हर्च्युअल क्लास २. पारंपारिक क्लास
ब. लिंग
१. मुले २. मुली

परतंत्र परिवर्त्य :
भावनिक बुद्धिमत्ता

## परिणामाचा तक्ता :

किशोर अवस्थेतील माहिती व तंत्रज्ञानाचा परिणाम दर्शवणारे मध्यमान व प्रमाण विचलनाचा तक्ता.

| लिंग | | क्लासरूमचे प्रकार | | टी गुणांक |
|---|---|---|---|---|
| | | व्हर्च्युअल | पारंपारिक | |
| मुले | मध्यमान | ०८ | ०७ | १.८८ |
| | प्रमाण विचलन | २.३० | २.०० | |
| मुली | मध्यमान | १० | ०८ | २.९८ |
| | प्रमाण विचलन | ३.६४ | २.८८ | |

$P<0.01$ level.

या तक्त्यात दर्शविल्या प्रमाणे मुलांचे मध्यमान व प्रमाण विचलन अनुक्रमे ८ व २.३० आणि मुलीचे मध्यमान व प्रमाण विचलन ($p<0.01$ df =79,80) १० व ३.६४ हे ०.०१ स्तरावर सार्थक दिसून आले.

## चर्चा :

व्यक्तीच्या मनाच्या आंतरिक अवस्थेला भावना, इमोशन असे म्हणतात. व्यक्तीचा जीवन अनुभव जसा जसा वाढत जातो तसतसे व्यक्तीच्या अंतरंगातील अवस्थेचा म्हणजे भावनेचा विकास होतो. सोशल वेबसाईट मुलांना एकमेकांमध्ये गुंतून ठेवणारा एक दुवा आहे. त्यामुळे त्यांच्यात भावनिक विचारांची देवाणघेवाण होते, असे मत इल्टो २००८. , सोशल साईटचा वापर मुले सल्ला मिळवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर करतात नेल्सन २००९. प्रस्तुत अभ्यासामध्ये माहिती तंत्रज्ञानाचा भावनिक विकासावर परिणाम दिसून आला.

## निष्कर्ष :

संशोधनात दिसून आलेली परिणाम लक्षात घेता असा निष्कर्ष काढता येईल की माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन भावनिक बुद्धिमत्ता वाढवता येऊ शकते.

## संदर्भ :


१. वैकासिक मानसशास्त्रः डॉ. रा. र. बोरुडे, मेघा कुमठेकर, डॉ. भरत देसाई, सौ. शीला गाळविलकर, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन.
२. विद्या गोखले, मुलांचा भावनिक विकास, साप्ताहिक सकाळ, फेब्रुवारी २०१०.
३. वैकासिक मानसशास्त्रः प्रा. हिरवे, प्रा. तडसरे, फडके प्रकाशन कोल्हापूर.
४. जरनल ऑफ ॲडोलेन्स डेव्हलपमेंन्ट.
५. Impact of social media on Adolescent's behavioral health in colifornia,*www.phi.org./g9g6xbfghdxoe3yytmc1rfvvm8lt1ly9sr3j369pstkojdly1...*


❖❖❖